# टाटाच्या कॅपिटल हाईट्सला सेव्हन स्टार क्रिसिल रेटिंगचा बहुमान

## • शहरातील पहिला उपक्रम • ट्रिलियम मॉल उघडण्याची घोषणा

■ लोकशाही वार्ता/नागपूर

टाटा सन्स लिमिटेडच्या देशातील सर्वांत मोठ्या टाटा रिॲलिटी अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या शहरातील कॅपिटल हाईट्स या प्रकल्पाला सेव्हन स्टार क्रिसील रेंटीगचा बहुमान मिळाला असल्याची माहिती टाटा रिॲलिटी अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड रिअल इस्टेटचे प्रमुख अभिजित माहेश्वरी यांनी पत्रपरिषदेत दिली. याप्रसंगी बोलताना अभिजित माहेश्वरी म्हणाले, प्रिमिअम रेसीडेन्सिअल अपार्टमेंटला सेव्हनस्टार रेटिंग मिळणारा कॅपिटल हाईट्स हा शहरातील एकमेव प्रकल्प आहे. प्रकल्पात रहिवाशांसाठी विविध सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. ज्यामध्ये क्लब हाऊस, मल्टीप्लेक्स, फुड कोर्ट, सर्व वयोगटासाठी डायनिंगची सुविधा, इन डोअर गेम्स, मुले व जेष्ठ नागरिक परिसर, योगा कोर्ट, ॲम्पीथिएटर, जिम्नॅशिअम, स्कॉश कोर्ट, स्विमिंग पूल, जॉगिंग ट्रॅक, सायकलिंग ट्रॅक, आदींचा समावेश आहे. तसेच कॅपिटल हाईट्स ही एक ग्रीन इमारत असून जास्तीत जास्त नैसर्गिक प्रकाश आणि व्हेंटिलेशनची सुविधा करण्यात आल्याचे सांगितले. कॅपिटल हाईट्स यानंतर ट्रिलियम मॉल उभारणार आहे. मॉल ४ लाख चौरसफुटाच्या जागेत साकारण्यात येणार असून येत्या दोन वर्षांत हा मॉल तयार होणार आहे. यामध्ये शॉपिंग, मनोरंजन, डायनिंगची प्रशस्त व्यवस्था राहणार आहे. सर्व मॉल वातानूकुलित राहणार असून मॉलचे डिझाईन आर. के. असोसिएट या आर्किटेक्चरल फर्मने तयार केले आहे. शहराच्या मध्यभागी असल्यामुळे नागरिकांना हा मॉल जास्त सोयीचा ठरणार असल्याची अपेक्षा माहेश्वरी यांनी वर्तविली आहे. ■



LOKSHAHI VARTA DATE 26/09/2015